**बिंदू नामावली नोंदवही तपासणी व रिक्त पदांच्या जाहिरातीकरिता अद्यावत नोंदीसह खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे**

| अ.क्र. | विवरण |
|---|---|
| १) | बिंदूनामावली नोंदवही तपासणी किंवा जाहिरात मान्यतेबाबतचा प्रस्ताव संस्थेचे अध्यक्ष किंवा सचिव यांचे स्वाक्षरीनीशी सादर करण्यात यावा. |
| २) | संस्थेमध्ये अधिकाराबाबत किंवा व्यवस्थापन मंडळात वाद-विवाद न्यायालयात सूरु नसल्याबाबत तसेच शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे बाबतीत कोणतेही प्रकरण न्यायप्रविष्ट नसल्याबाबतचे अध्यक्ष व सचिव यांचे स्वाक्षरीचे हमीपत्र. |
| ३) | संस्था नोंदणी प्रमाणपत्र. |
| ४) | संस्थेचे परिशिष्ट-अ (शेडूल-१) ची प्रत (धर्मादाय कार्यालयाची सांक्षाकिंत प्रत) संस्थेत सद्यस्थितीत कार्यान्वित असलेल्या व्यवस्थापनाच्या तपशिलाकरिता. |
| ५) | शैक्षणिक विभागाचे संलग्निकरण पत्र. |
| ६) | महाराष्ट्र शासनाचे महाविद्यालय मंजूरी आदेश. |
| ७) | मा.सहसंचालक, उच्च शिक्षण औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांची शैक्षणिक कार्यभार मान्यता (वर्कलोड) प्रत सादर करणे आवश्यक.<br>(व्यावसायिक अभ्यासक्रमास विद्यार्थीसंख्येच्या प्रमाणातपद मान्यता देण्यात येते त्याकरीता एनसीटीई/एआयसीटी, समाजकार्य, क्रीडा विभाग आदी मान्यता पत्राची प्रत. उदा. फार्मसी, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षण इत्यादी.) |
| ८) | विशेष कक्ष विभागाकडून यापूर्वी जाहिरात मान्यता घेतली असल्यास त्याची प्रत सोबत जोडणे अनिवार्य आहे. |
| ९) | बिंदूनामावली नोंदवहीमध्ये अद्ययावत नोंदी घेऊन त्यांची प्रमाणपत्रे सोबत जोडावी. (जसे- विशेष कक्ष विभागाने पुर्वी दिलेली जाहिरात मान्यता, शैक्षणिक विभागाचे मान्यता पत्र, नियुक्ती पत्र, रुजू अहवाल, राखीव प्रवर्गातील उमेदवार असल्यास जातीचा दाखला व जात वैद्यता प्रमाणपत्राच्या सत्यप्रती) |
| १०) | बिंदूनामावली नोंदवहीत नोंद असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गातील कर्मचारी यांचे जन्म तारीख तपासण्याकरिता वर्ग १० वीची बोर्ड सनद जोडण्यात यावी. |
| ११) | बिंदूनामावली नोंदवही संस्थेची सर्व अभ्यासक्रमाकरीता एकच ठेवण्यात यावी. (अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालया करिता स्वतंत्र नोंदवही असावी.) |
| १२) | शिक्षक संवर्ग व शिक्षकेत्तर संवर्गाची वेग-वेगळी बिंदूनामावली तपासण्याकरीता सादर करण्यात यावी. |
| १३) | शिक्षकेत्तर सवंर्गाची सरळसेवा व पदोन्नती अशा दोन वेगवेळया बिंदूनामावली तपासणी करीता सादर करण्यात यावी. |
| १४) | **अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्थानी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या प्रस्तावासोबत अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र, तसचे वरील नमूद अ.क्र. १ ते ६ व ८ मध्ये दर्शविलेली माहिती सोबत जोडण्यात यावी.** |
| १५) | **अनुदानित महाविद्यलयातील पदभरती जाहिरात मान्यता प्रस्ताव सादर करताना मा. संचालक/सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग यांचे नाहरकत (NOC) प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच जाहिरात मान्यता देण्यात येईल.** |
| १६) | **प्राचार्य पदाच्या जाहिरातीकरीता कार्यमुक्त पत्र सोबत जोडण्यात यावे.** |

**संस्थेच्या लेटरपॅडवर रिक्त पदांबाबत खालील प्रमाणे प्रस्ताव दाखल करण्यात यावा**

दिनांक :

प्रति,
मा. उपकुलसचिव
विशेष कक्ष (आरक्षण)
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

विषय :-प्राचार्य/संचालक/ग्रंथपाल/शारीरिक शिक्षण निर्देशक/सहायक प्राध्यापक
रिक्त पदांना आरक्षण निश्चिती करुन मिळणे बाबत.

महोदय,

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, -------------------------------- संस्था संचलित ---------------------- महाविद्यालय,-------------- ता. -------------- जि.----------------- या **अनुदानित / विना अनुदानित / कायम विना अनुदानित महाविद्यालय/इन्स्टिटयुट मधील प्राचार्य/संचालक, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण निर्देशक/सहायक प्राध्यापक**व **शिक्षकेत्तर कर्मचारी** सरळसेवा / पदोन्नतीपदांची बिंदू नामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी करुन आरक्षण निश्चिती करुन देण्यात यावी, ही विनंती.

सोबत-
प्रपत्र, परिशिष्ट, गोषवारा याप्रमाणे आवश्यक पूरक दस्ताऐवज

आपला

अध्यक्ष/सचिव

<u>**संस्थेच्या लेटरपॅडवर शपथपत्र/हमीपत्रदाखल करण्यात यावे**</u>

दिनांकः

**शपथपत्र/हमीपत्र**

आम्ही अध्यक्ष व सचिव------------------संस्था,---------- ता.------------जि.----------- याद्वारे शपथपूर्वक हमीपत्र लिहून देतो की, आमच्या संस्थेच्या व्यवस्थापन मंडळात अधिकार पदाबाबत वाद-विवाद कोणत्याही न्यायालयात सुरु नाही. तसेच प्राचार्य, अध्यापक किंवा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सेवा विषयक हक्कासाठी न्यायालयात कोणतेही प्रकरण दाखल अथवा न्यायप्रविष्ट नाही.

सर्व नोंदी जसे भरती वर्ष, नाव, जात, प्रवर्ग, नियुक्ती दिनांक बरोबर आहेत. संवर्ग निहाय मंजूर पदांची विहित नमुन्यात बिंदूनामावली तयार करण्यात आली आहे. संस्थेतंर्गत मंजुर असलेल्या प्राचार्य, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक, सहायक प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सर्व नोंदी अद्यावत घेण्यात आल्या आहेत.

संस्थेची संवर्गनिहाय बिंदूनामावली या पूर्वी मा.सहाय्यक आयुक्त (मावक) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे कडून दिनांक **----------** रोजी तपासून घेतली आहे.

सबब, शपथपत्र/हमीपत्र सादर करण्यात येत आहे.

(अध्यक्ष यांचे नाव)
**अध्यक्ष**

(सचिव यांचे नाव)
**सचिव**

## <u>संस्थेच्या लेटरपॅडवर सादर करण्यात यावे</u>

दिनांक / /२० रोजी संस्थेतील शिक्षक कर्मचाऱ्यांची विषय निहाय माहिती दर्शविणारे विवरणपत्र.

| अ.क्र. | विषय | मंजूर पदे | भरेलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

संस्थेतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संवर्ग निहाय माहिती दर्शविणारे विवरणपत्र.

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरेलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

उपरोक्त प्रमाणे सर्व माहिती व प्रमाणपत्र सोबत जोडून परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यास कार्यालयास पुढील कार्यवाही करणे सुलभ होइल.